# पोलीस आयुक्तालय, अमरावती शहर

दैनंदिन गुन्हे - दिनांक ०१/०२/२०२३

## ➢ दुखापत :-

| अ.क्र. | पो.ठाणे<br>अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | ` पो. स्टे. राजापेठ अप क्र. ११८/२३ कलम ३२४,५०४,५०६ भादवी | हमालपुरा करणबारच्या मागचे मागे अमरावती शहर | घ.ता. वेळ दि. ३१/०१/२०२३ ते २३-३० वा दरम्यान दा.ता. वेळ दि. ०१/०२/२३ चे ११/४५ वा | दिगांबर नारायण खरसाळे वय ५३ वर्ष रा हमालपुर करणबारचे मागे अमरावती | नितिन चितरे वय ३० रा हमालपुरा अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फि व आरोपी हे एकाच मोहल्यातील असुन फिर्यादी यांचेजवळ नमुद आरोपी नमुद वेळी आला जुना वादाच्या कारणावरुन फि ला लाथ मारली व शिविगाळ करु लागला त्याला फि समजाविण्याचा प्रयत्न केला तर नमुद आरोपीने त्याचे जवळीची कैची काढुन फि च्या डोक्यावर मारुन जखमी केले तसेत तिथला दगड सुध्दा उचलुन मारला व परत मारण्याची धमकी दिली अशा फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल . |

## ➢ घरफोडी :-

| अ.क्र. | पो.ठाणे<br>अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १. | राजापेठ<br><br>अप.क्र. ११७/२०२३ कलम ४५४, ४५७,३८० ५११ भा.द.वि. | लहानुजी कॉलनी गजानन मंदीर जवळ साई नगर ` अमरावती | घ.ता.वेळ - दि. २८/०१/२०२३ चे १७.०० वा. ते दि ३१/०१/२३ चे २२/०० वा दरम्यान दा.ता.वेळ - दि. ०१/०२/२०२३ चे ०१/५३ वा. | बंडूनाना शंकरराव धावडे वय ७१ रा दत्त कॉलनी दस्तुर नगर अमरावती | अज्ञात | हकीकत अशाप्रकारे आहे की, नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी फिर्यादीयांचे चुलत भाउ हे त्यांचे परीवारासह मुंबई येथे घराला कुवुप कडी लावुन गेले होते फि यांना त्यांचा चुलत भाउ यांनी फोनव्दारे माहीती दिली की घराचे समोरील लॉंकचे कडी कोंडा तुटलेला आहे याबाबत शोजारीनी जावुन पाहणी केली असता त्यांचे चुलत भाउ यांचे घराचे समोरील दरवाजाचे कडी कोंडा तुटलेला दिसुन आला वरुन ते घराचे आत प्रवेश करुन पाहणी केली असता मागील आणि समोरील बेडरुमचे प्लायवुड चे आलमारी उघडुन त्यामधील सामान हे अस्ताव्यस्त फेकुन कुणीतरी अज्ञात चोरान चोरी करण्याचा प्रयत्न केला व समोर ठेवलेली अँसेस १२५ क्र एम एच २७ सी टी ४७७९ क्रमांकांचे गाडीचे नंहप प्लेट काढुन दुरउपयोग करण्याचे उद्देशाने घेवुन गेले`अशा फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल. |

➢ **चोरी :-**

| अ .क्र . | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | पोस्टे गाडगेनगर अमरावती अपक्र १५१/२०२३ कलम ३७९ भादवी | रूख्मीनी बार मागे शीतल नगर कठोरा जकात नाका रोड अमरावती | घता वेळ दि २९.०१.२०२३ चे १८.०० वा<br><br>री ता वेळ -०१.०२.२०२३ चे ०१.०२ वा | प्रथमेश प्रविण सोळंके वय २३ व्यवसाय बील्डरशीप बांधकाम रा वारकरी नगर गोपाल नगर जवळ अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घतावेळी व ठीकानी दि ३१.०१.२०२३ प्रथमेश प्रविण सोळंके वय २३ व्यवसाय बील्डरशीप बांधकाम रा . वारकरी नगर गोपाल नगर जवळ अमरावती मी समक्ष पोलीस स्टे येथे येवुन जबानी रीर्पोट देतो की वरील पत्यावर परीवारासह राहत असुन मागील दोन र्वषापासुन कंस्ट्रकशन चे काम करतो तसेच माझे कठोरा जकात नाका रूख्मीनी बार चे मागे शीतल नगर येथे अवीनाश ठाकरे यांच्या प्लॉटवर मी ७ महीण्यापासुन बांधकाम करत असुन माझे् बांधकामाचे साहीत्य त्याच साइडवर राहते तसेच सदर बांधकाम साठी मी ठेकेदार यांना बांधकामाचा ठेका दीला असुन दोन मजलीचे काम सदर प्लॉटवर करण्यात आले दि .२९.०१.२०२३ रोजी माझ्या साइडवर अजर श्वान ठेकेदार यांचे बांधकाम सुरू होते व ०६.०० वाजता ठेकेदार व मजुर सदर साइडवरून बांधकाम करून घरी निघुन गेले दुस-या दिवशी ३०.०१.२०२३ रोजी सोमवार असल्याने काम बंद होते तेव्हा मी दुपारी ०२.०० वा साइडवर काम बघण्यासाठी गेलो असता मला माझ्या साइडवरील झोपडपटटी तील बांधकामाचे साहीत्य र्वणन -१ , ८ एमएम चे १ १/२ लोखंडाचे बंडल की अं २००० रू नं २, १० एमएम चे लोखंडाचे बंडल की अं १५०० रू नं ३ , १२ एम एम चे लोखंडाचे बंडल की अं १५०० रू नं ४ , ६ एम एम चे लोखंडाचे बंडल की अं १४०० रू ५ , १२ बॅग अलट्राटेक सीमेंट की अं १८०० रू नं ६ पी व्ही सी पाइप २० नग की अं २०० रू नं ७ लोखंडी घमेले ७ नग की अं ५०० रू नं ८ पावडे ४ नग की अं ३०० नं ९ लोखंडी चैली ३ नग की अं १२०० रू नं १० लोखंडी चाळणी की अं ५०० रू नं ११ लोखंडाचे बारचे वेस्टेज तुकडे वजन ५० केजी कीअं १७०० रू असा एकुन १२६०० रू चा मुददेमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला वरून अज्ञात चोरावीरूध्द पोस्टेला रीर्पोट देत आहो वरून सदर चा गुन्हा दाखल . |
| २. | भातकुली 26/2023 कलम 379 भादवी . | पेढी नदीचे पात्रात गणोजा देवी ता. भातकुली | घ.ता.वेळी दि.01.02.23 रोजी चे 08.00 वा.<br>दा.ता.वेळ दि.01.02.23 रोजी चे 11.58वा<br>पो.स्टे.ला माहीती दि.01.02.23 रोजी चे 10.15 वा. | अमोल मोतीराम ढोके वय 45 वर्ष रा.खाटीकपुरा ता भातकुली<br><br>गजानन रामदास हिवसे वय 52 वर्ष व्यवसाय तलाठी गणोजादेवी रा शांतीनगर अमरावती | 1) निलेश वासुदेवराव शेरोळे वय 35 वर्ष रा गणोजादेवी ता भातकुली | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी हे ग्राम गणोजा देवी येथे तलाठी पदावर कार्यरत आहे फिर्यादी हे मा. तहसिलदार भातकुली यांचे आदेशाने अवैध गौण खनिज चोरी रोखणे बाबत नमुद घटना तावेळी पेट्रोलींग करीता पथक सदस्य सतीश नाना शिरसाठ कोतवाल व पोलीस पाटील बोरकर यांचे सहगणोजादेवी परीसरात पेट्रोलींग करीत असता त्यांना गणोजी देवी येथील पेढी नदीच्या पात्राजवळ आले असता एक ट्रॅक्टर व ट्रॉली लाल फिक्कट रंगाची नदीच्या पात्रातुन रेती घेवुन निघटांना दिसला त्यांनीत्याचा पाठलाग केला असता तो गणोजादेवी ते दाढी रोडवरील मनिष शेरोळे यांचे शेत गट नंबर 131मधील गुरांचा शेडच्या मागे पकडला ट्रॅक्टर चालक निलेश वासुदेवराव शेरोळे हा होता त्याला रेती बाबत विचारन केली व रॉयल्टी विचारली असता रॉयल्टी नसल्याचे त्याने सांगीतले त्याच्या टॅक्टर व ट्रॉलीवर नंबर नव्हता फिर्यादी यांनी आरोपीस त्याचा ट्रॅक्टर घेवुन तहसील कार्यालय बातकुली येथे लावण्यास त्याने मी येतो असे म्हटले व त्यानंतर त्याचे लगेच ट्रॅक्टर मधुन रेती खाली केली व पळुन गेला फि ने त्याचा पाठलाग केला तो मिळुन आला नाही सदर आरोपी याने त्याचेट्रॅक्टर व ट्रॉली मध्ये 1 ब्रास रेती किमंत अंदाजे 4000 रु ची चोरी केली. अशा जबानी रिपोर्ट व मेडी. सर्टीवरुन वरुन सदरचा गुन्हा दाखल. |

## ➢ विश्वासघात (फसवणुक) :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| ०१ | पोस्टे गाडगेनगर अमरावती अपक्र १५२/२०२३ कलम ४१९,४२० भादवी | कठोरा नाका चौक अमरावती | घतावेळ -दि ३१.१.२०२३ चे १८.४५ वा<br><br>रीतावेळ -०१.०२.२०२३ चे ०१.३४ वा | शरद उत्तमराव बुरघटे वय ६५ व्यवसाय सेवानीवृत्ती प्रॅापर्टी डीलर रा. सिध्दी विनायक अपार्टमेंट उर्वशी नगर अमरावती | दोन इसम अंदाजे वयोगट ३० ते ३५ वर्ष अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घतावेळी व ठीकानी मी समक्ष पोस्टेला येवुन जबानी रीपोंट देतो की वरील नमुद पत्यावर माझ्या परीवारासोबत राहत असुन मी एरीकेशन डीपार्टमेंट मधुन सेवानिवुत्त झालो असुन सध्या प्रॅापटी डीलर चे काम करतो आज दि ३१.०१.२०२३ रोजी सायंकाळी ०६.४५ वा मी कठोरा नाका चौक येथील चप्पल च्या खोक्याजवळ माझ्या मीत्राची वाट बघत थांबलो असता तेथे दोन इसम वय अं ३० ते ३५ वयोगटातील आले व मला म्हणाले की आम्ही पोलीस आहो आमची चोकशी सुरू आहे .काल याच ठीकानी तुमच्या सारखे गूहस्थ उभे असतांना लुटपाट झाले आहे करीता तुम्ही तुमच्या जवळील मौल्यवान वस्तु असतील तर काढुन ठेवा तेव्हा त्यापैकी एकाने माझ्या जवळचा रूमाल त्याचे हातात ठेवला व त्यांनी मला माझ्या बोटातील सोन्याच्या दोन अंगठया वजन प्रत्यकी १० ग्राम की अं ६०,००० रू च्या त्यांनी मला बोटातुन काढुन तुमच्या रूमालामध्ये ठेवा असे म्हणाले मी माझ्या उजव्या हातातील दोन अंगठया काढुन त्याचे हातात असलेल्या रूमालामध्ये ठेवल्या व त्यांनी त्या रूमालाच्या गुडाळा करून माझ्या हातात रूमाल हा तुमच्या खीशात ठेवुन दया व इथुन लवकर घरी चालले जा मी तो गुंडाळा केलेला रूमाल माझे खीशात ठेवला व नंतर घरी जात असतांना मला शंका आली तेव्हा मी तो रूमाल काढुन बघीतला असता त्या दोन्ही अंगठया नव्हत्या मी ते इसम भेटले त्या ठीकानी जावुन त्या दोन इसमांना पाहीले असता ते मला दिसुन आले नाही सदर दोन इसमापैकी एक इसमाचे र्वणन रंग गोरा उंची ६ फुट त्याच्या अंगात काळया रंगाचे शर्ट व जिन्स पॅन्ट केसाची कटीग बारीक बांधा मजबुत व दुस-या इसमाचे वर्णन उंची अं ५ फुट ६ इंच वर्णृ गोरा बारीक कटींग असलेला अंगात चौकळीचे शर्ट व साधा फुलपॅन्ट अशा वर्णनाचे दोन अनोळखी इसमानी माझे हातातील सोन्याच्या २ अंगठया वजन २० ग्राम की अं ६०,००० रू च्या पोलीस असल्याची बतावणी करून घेवुन गेले व माझी फसवणुक केली त्याचे विरूध्द कार्यवाही व्हावी करीता जबानी रीपोर्ट देत आहो करीता फीर्यादीचे जबानी रीपोर्ट वरून सदर चा गुन्हा दाखल |

## ➢ अपघात :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचे नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | राजापेठ<br><br>अप.क्र. ११६/२०२३ कलम २७९,३३७ भा.द.वि. | होटल लॅार्डस समोर सामरा नगर जवळ अमरावती | घ.ता.वेळ - दि. ३१/०१/२३ चे १९/४० दरम्यान<br><br>दा.ता.वेळ - दि. ०१/०२/२०२३ चे ००/१२ वा. | एक महिला | जेसीबी क्र एम एच २७ डी ई २२९६ चा चालक | हकीकत अशाप्रकारे आहे की, नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी फिर्यादी हे त्यांची Wagon-R गाडीने चक्रधर येथुन बडनेरा जुना बायपास रोडने त्यांचे नातेवाईकासह जात असतांना लॅार्डस होटेल समोर विरुध्द दिशेने जेसीबी क्र एम एच २७ डी ई २२९६ चा चालकाने अतिवेगाने येवुन निष्काळजीपणाने सामरा नगर चे आत मधील रोज कडे जाण्यास वळत असतांना त्यांचे Wagon-R गाडीला जोरदार धडक मारुन अपघात केला त्यामुळे नातेवाईक उपेंद्र कडु याचे उजवे हाताच्या मनगटाला मुका मार लागुन दुखापत झाली नमुद क्रमांकाचे गाडीचे बोनेट कुलंट किट ,ए सी रेडीयर व इंजीनची तुटफुट होवुन कि अं १,००,००रु चे नुकसान झाले अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल . |

➢ **अकस्मात मृत्यु :-**

| अ .क्र . | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | झोन क्र. | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | बडनेरा मर्ग क्र. ०७/२०२३ कलम १७४ जा.फौ. | ०१ | ग्राम वडुरा डॉ. वसु यांच्या पडीत शेतातील विहीर बडनेरा अम. | अनोळखी पुरुष इसम वय अम. ३० ते ३५ वर्ष अंगावर पांढ-या गंराचा शर्ट व काळ्या रंगाची पँट | विशाल नामदेवराव चहाकार वय ३५ वर्ष व्यवसाय - होमगार्ड रा. श्रीनाथ रेसीडेसी, वरुडा, एक्सप्रेस हायवे जवळ बडनेरा. | बुडून मुत्यू | मी समक्ष पो. स्टे ला येवुन जबानी रिपोर्ट देतो की मी वरिल दिलेल्या पत्यावर राहते व होमगार्ड मध्ये काम करतो . मी दररोज माझेकडे असलेला कुत्रा घेवुन सकाळी ०६/०० वा. घराकडे असलेल्या खुल्या जागेत फिरत असतो. आज दि. ०१/०२/२०२३ रो. स. ०८/३० वा दरम्यान मी माझा कुत्रा घेवुन समोरिल वसु यांच्या खुल्या पडीत शेतात फिरत असता मला विहीरीमध्ये पाण्यावर एक पुरुष जातीचे वय ३० ते ३५ वर्ष वयाचे इसमाचे प्रेत उबळ्या स्थितीत पाण्यावर तरंगताना दिसले . त्याच्या अंगामध्ये पाांढ-या गंराचा शर्ट व काळ्या रंगाची पँट दिसुन आली. तसेच विहीरीच्या बाहेर पांढ-या व निळ्या पट्े असलेली स्लिपर चप्पल दिसुन आली. विहीरीत पडलेल्या दिसुन आलेला इसम माझ्या ओऩखीचा नाही, सदर इसमाबाबत मी पोलीसाना फोनवर माहिती दिली. तरि सदर अनोळखी इसमाचे मरऩाबाबत चौकशी होण्याकरिता रिपोर्ट देत आहे. अश्या फिर्यादीवरुन सदरचा मर्ग क्र. ०७/२०२३ कलम १७४ जा.फौ. प्रमाऩे दाखल. |